# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः08.10.2024** **वारःमंगळवार**

---

1. 2026 पर्यंत देश नक्षलमुक्त होईल, असा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास
2. माओवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात महाराष्ट्रानं मोठं यश मिळवलं असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन
3. महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांत संविधान भवन उभारणार असल्याची केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांची घोषणा
4. यंदाचं विष्णुदास भावे गौरव पदक, ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर आणि
5. पुण्यातल्या बोपदेव घाट अत्याचार प्रकरणातील आरोपींची माहिती देणाऱ्याला पोलिसांकडून दहा लाख रुपयांचं बक्षीस जाहीर

**<u>अमित शहा, शिंदे-नक्षलग्रस्त राज्ये बैठक</u>**

केंद्र आणि राज्य सरकारच्या उत्तम समन्वयामुळे, देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन होत असून, मार्च 2026 पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला आहे. नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक काल नवी दिल्लीत शहा यांच्या अध्यक्षतेखाली झाली; त्यावेळी ते बोलत होते. गेल्या काही वर्षांत, नक्षली हिंसचारांच्या घटनांमध्ये घट झाली असून, आगामी काळात यात आणखी घट होईल, अशी ग्वाही शहा यांनी दिली. नक्षलवाद हा विकासाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे, असं सांगत, नक्षलवादाकडे ओढल्या गेलेल्या सर्व तरुणांनी शस्त्रांचा त्याग करून, मुख्य प्रवाहात यावं असं आवाहन शहा यांनी यावेळी केलं. या बैठकीला महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, ओडिशा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

माओवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात महाराष्ट्रानं मोठं यश मिळवलं असून गडचिरोली जिल्ह्याचा उत्तर भाग प्रथमच सशस्त्र माओवाद्यांपासून मुक्त झाला आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बैठकीत बोलताना सांगितलं. राज्य सरकारनं, नक्षलग्रस्त भागात रस्ते, पायाभूत सुविधा, इंटरनेट, उद्योग, आरोग्य आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांत विकासकामं केली असल्याचं ते म्हणाले.

**<u>किरेन रिजिजू</u>**

आगामी काळात महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांत संविधान भवन उभारणार असल्याची घोषणा केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केली. विरोधक संविधानाबद्दल सामान्य नागरिकांची दिशाभूल करत आहेत. नागरिकांच्या मनातला हा संभ्रम दूर व्हावा, याकरता संविधान भवनाच्या माध्यमातून वास्तव स्थितीची माहिती करून देण्यात येईल असं रिजिजू म्हणाले. केंद्र आणि राज्य सरकारच्या आर्थिक सहकार्यातून उभारण्यात येणाऱ्या या संविधान भवनातून अल्पसंख्याक वर्गाच्या समस्यांचा निपटारा करण्यात येईल, तसंच महाराष्ट्रातील बौद्ध विहारांचा विकास करण्यात येईल असंही रिजिजू म्हणाले.

**<u>राज्यपाल-ग्रामसभा-पालघर</u>**

नाशिकमध्ये लवकरच आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्यात येईल अशी घोषणा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल पालघर जिल्ह्यात बोलताना केली. जव्हारमध्ये आयोजित पेसा ग्रामसभा महासंमेलनात ते बोलत होते. आदिवासी

विद्यापीठाअंतर्गत, आंतरराष्ट्रीय दर्जाचं वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्यात येईल, यामध्ये जास्तीत जास्त जागा आदिवासी समुदायातील विद्यार्थ्यांसाठी राखीव असतील असं ते म्हणाले.

**<u>वाई-अजित पवार</u>**

सातारा जिल्ह्यातील वाई इथल्या विविध विकास कामांचं भूमीपुजन आणि लोकार्पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल झालं. कृष्णा नदीवर, 15 कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या नवीन पुलाचं लोकार्पण पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. या मतदार संघातील विकासकामं तातडीनं सुरू करून ती लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना पवार यांनी यावेळी केल्या.

**<u>फडणवीस-मंगळवेढा</u>**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातल्या आंधळगांव इथ पाणी वितरण व्यवस्थेचं भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल करण्यात आलं. या योजनेमुळे मंगळवेढा मतदारसंघातील 24 गावांचा पाणीप्रश्न सुटणार आहे ही समाधानाची बाब असल्याचं फडणवीस म्हणाले.

**<u>बिडीडी चाळ-नामकरण</u>**

मुंबईच्या नायगाव इथल्या बीडीडी चाळीचं नामांतर 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर बीडीडी संकुल' असं करण्यात आलं आहे. यासंदर्भातला शासन निर्णय काल जारी करण्यात आला.

**<u>विष्णुदास भावे सन्मान-सांगली</u>**

नाट्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी दिलं जाणारं यंदाचं विष्णुदास भावे गौरव पदक, ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर झालं आहे. अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी काल सांगलीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. गौरव पदक, पंचवीस हजार रुपये, आणि स्मृतीचिन्ह, असं या पुरस्काराचं स्वरूप असून, 100व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल यांच्या हस्ते, 5 नोव्हेंबरला; रंगभूमि दिनी हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना सुहास जोशी म्हणाल्या....

**<u>राज ठाकरे</u>**

महाराष्ट्राच्या बिघडलेल्या राजकीय वातावरणाबाबत साहित्यिकांनी त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून परखडपणे व्यक्त व्हावं; आपल्यावर टीका होईल अशी भीती साहित्यिकांनी बाळगू नये, असं स्पष्ट मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. नवी दिल्ली इथं होणाऱ्या आगामी मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचं अनावरण महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहत झालं; त्यावेळी ठाकरे बोलत होते.

**<u>गदिमा</u>**

मराठी भाषेचं वैभव वाढवणारे ज्येष्ठ लेखक, गीतकार ग. दि. माडगूळकर यांचं देखणं स्मारक उभारण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध होण्याकरता प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना दिले. कोथरूडमध्ये महात्मा सोसायटीजवळ गदिमांचं स्मारक उभारण्याचं काम सुरू असून पहिल्या टप्प्याचं काम जवळपास पूर्ण झालं आहे; या कामाची पाहणी केल्यानंतर पाटील बोलत होते.

**<u>हर्षवर्धन पाटील</u>**

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी काल भाजपाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. इंदापुरातल्या कार्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या आग्रहामुळे हा निर्णय घेतल्याचं पाटील म्हणाले. हर्षवर्धन पाटील यांची मुलगी अंकिता यांनीही भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे.

**<u>रत्नागिरी-रिलायन्स प्रकल्प</u>**

रत्नागिरीतल्या रत्नदुर्ग किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या शिवसृष्टीच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण काल पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं. मुंबईतल्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या कलाकारांनी ही शिवसृष्टी साकारली असून, दोन महिन्यांमध्ये तिचं काम पूर्ण होईल, असंही त्यांनी या वेळी सांगितलं.

**<u>अलंकार पूजा-तुळजाभवानी, कोल्हापूर</u>**

शारदीय नवरात्रोत्सवात, काल, ललिता पंचमी निमित्त, तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिरात देवीची अलंकार महापूजा बांधण्यात आली. पूजेनंतर काढण्यात आलेल्या छबिना मिरवणुकीत भाविक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. ललिता पंचमीनिमित्त, करवीरनिवासिनी श्री महालक्ष्मी अंबाबाईची, श्री सरस्वती देवी रूपातील अलंकार पूजा साकारण्यात आली होती.

**<u>बोपदेवघाट अत्याचार प्रकरण</u>**

पुण्यातल्या बोपदेव घाटात महाविद्यालयीन तरुणीवर झालेल्या सामुहिक बलात्कार प्रकरणाच्या तपासासाठी पोलिस कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करणार आहेत. या प्रकरणातील आरोपींची माहिती देणाऱ्याला पोलिसांकडून दहा लाख रुपयांचं रोख बक्षीस देण्यात येणार आहे. या प्रकरणी दोनशेहून अधिक सराईतांची चौकशी सुरू करण्यात आली असल्याची माहिती पोलीस सह-आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली आहे.

**<u>अपघात</u>**

राज्यात काल विविध ठिकाणी झालेल्या अपघातात 4 जणांचा मृत्यू झाला. वाशिम जिल्ह्यातील, पुसद-वाशिम मार्गावरील मारवाडी फाट्याजवळ काल सकाळी प्रवासी गाडीला झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आणि सात जण जखमी झाले. अपघातग्रस्त गाडीतील सर्वजण माहूरगड इथल्या देवीचं दर्शन घेऊन वाशिमकडे येत होते.

दूसरा अपघात सोलापूर - सांगली महामार्गावरील, सांगोला तालुक्यातील चिंचोली बायपास इथे घडला. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले. अपघातातील मृत आणि जखमी कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत. तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन परत जाताना भाविकांच्या गाडीची, ट्रकला धडक बसून हा अपघात झाला.

**<u>पुणे मॅरेथॉन</u>**

पुण्याच्या क्रीडा विश्वात मानाची समजली जाणारी 38वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा एक डिसेंबर रोजी होणार असून या स्पर्धेच्या नाव नोंदणीला सुरुवात झाली आहे. स्पर्धा प्रवेशाची अंतिम तारीख 15 नोव्हेंबर आहे. www.Marathon Pune.com या संकेतस्थळावरून प्रवेश अर्ज भरता येईल. ही स्पर्धा पूर्ण मॅरेथॉन, अर्ध मॅरेथॉन, दहा किलोमीटर, पाच किलोमीटर, तीन किलोमीटर आणि दिव्यांग दौड अशा विविध गटात होणार आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात राज्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.